**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**रविवार दिनांक २१ जून २०२६**

**ठळक बातम्या**

1. **योग ही मानवी चैतन्याची अभिव्यक्ती आहे, असं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचं आंतरराष्ट्रीय योग दिनाच्या कार्यक्रमात प्रतिपादन.**
2. **विदर्भासह राज्यभरात योग दिन उत्साहात साजरा.**
3. **नगर परिषदांच्या पोटनिवडणुकीची मतमोजणी सुरू; अकोला जिल्ह्यातील पातूर नगराध्यक्षपदी काँग्रेस उमेदवार हिदायत खान विजयी.**
4. **राज्य विधिमंडळाचं पावसाळी अधिवेशन उद्यापासून सुरू होणार.**

**आता सविस्तर बातम्या .......**

योग दिन-भारत

१२ वा आंतरराष्ट्रीय योग दिवस आज भारतासह जगभरात साजरा होत आहे. 'निरोगी वयोवृद्धीसाठी योग' ही यंदाच्या योगदिनाची संकल्पना आहे. कोलकाता इथल्या रेड रोड इथं योगदिनाचा मुख्य कार्यक्रम आयोजित करण्यात आला, यात पंतप्रधान नरेंद्र मोदी सहभागी झाले. त्यांच्यासोबत हजारो नागरिकांनी आज सकाळी योगासनं केली. २१ जून हा दिवस पृथ्वीच्या काही भागात सर्वात मोठा दिवस असतो, योग दिनामुळे या दिवशी सर्वात मोठा उत्सवही साजरा होत आहे, असं मोदी यावेळी म्हणाले. योग ही केवळ शारीरिक कसरत नाही, तर मानवी चैतन्याची अभिव्यक्ती आहे, असं ते म्हणाले. योग हा आपल्या दैनंदिन आयुष्याचा भाग व्हायला हवा, योग सर्वांना जोडण्याचं काम करतो, असं म्हणत पंतप्रधानांनी सर्वांना योग दिनाच्या शुभेच्छा दिल्या...

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू मध्यप्रदेशात जबलपूर इथं आयोजित योगदिनाच्या कार्यक्रमात सहभागी झाल्या. गॅरीसन मैदानावर हा कार्यक्रम झाला. मुंबई इथं लोकभवनात आयोजित योगदिनाच्या कार्यक्रमात राज्यपाल जिष्णूदेव वर्मा यांनी सहभाग घेतला. लोकभवनात यंदाच्या योगदिनाचं आयोजन भारतीय तटरक्षक दलानं केलं आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस मुंबईत जुहू बीचवर फूड कोर्ट जवळ आयोजित योगदिनाच्या कार्यक्रमात सहभागी झाले. नियमित योग करून जीवनशैलीविषयक आजारांना दूर ठेवायला हवं, असं मुख्यमंत्री यावेळी म्हणाले.

योग विदर्भ

आंतरराष्ट्रीय योग दिन आज राज्यात ठिकठिकाणी उत्साहात साजरा करण्यात आला. या निमित्तानं विदर्भात आयोजित अनेक नाविन्यपूर्ण कार्यक्रमात मान्यवरांसह सर्व वयोगटातल्या नागरिकांनी सहभाग घेतला. **नागपूर** महानगरपालिका आणि जनार्दन स्वामी योगाभ्यास मंडळाच्या वतीनं यशवंत स्टेडियम इथं आंतरराष्ट्रीय योग दिनाचा कार्यक्रम पार पडला. सकाळी साडे सहा वाजता सुरू झालेल्या या कार्यक्रमामध्ये योगाभ्यासी मंडळाच्या नागपुरातील १०७ हून अधिक शाखा, ब्रह्मकुमारी, NCC, केंद्रीय राखीव पोलीस दल, प्रादेशिक पोलीस प्रशिक्षण केंद्र यांसह योगसाधक मोठ्या संख्येनं उपस्थित होते. नागपूर येथील एनडीआरएफ अकादमीच्या सुरादेवी आणि सिव्हिल लाइन्स कॅम्पसमध्ये देखील मोठ्या उत्साहात योग कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं. त्याचप्रमाणे कोकुयो वर्कप्लेस इंडिया लिमिटेड यांनी आज नागपूर इथल्या आपल्या उत्पादन प्रकल्पात देशातील सर्वात मोठ्या कार्यस्थळावरील 'चेअर योगा' आणि वेलनेस सत्राचं आयोजन केलं. या उपक्रमात कंपनीचे कर्मचारी तसेच त्यांच्या कुटुंबीयांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.
**अकोला** जिल्हा प्रशासनातर्फे आज सकाळी साडे सहा ते ८ वाजेदरम्यान डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ इथल्या दीक्षांत सभागृहात आंतरराष्ट्रीय योग दिनाचा मुख्य कार्यक्रम मोठ्या उत्साहात संपूर्ण झाला. या कार्यक्रमात योग मार्गदर्शन आणि प्रात्यक्षिकं आयोजित करण्यात आली होती. **वाशिम** शहरात देखील पतंजली योग समिती आणि जिल्हा प्रशासनाच्या वतीनं विविध ठिकाणी सामूहिक योगसाधना कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं. स्वागत लॉन इथं पतंजली योग समितीच्या कार्यक्रमाचं उद्घाटन जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांच्या हस्ते झाले. तसंच क्रीडा संकुल इथं जिल्हा प्रशासनानं विशेष योगाभ्यास वर्ग आयोजित केला होता. यात गृहरक्षक दलाचे जवान, खेळाडू, अधिकारी, कर्मचारी आणि नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त **गोंदिया** शहरातील इंदिरा गांधी स्टेडियम या ठिकाणी भव्य योग शिबिराचं आयोजन करण्यात आलं होते. या कार्यक्रमात विद्यार्थी, महिला, ज्येष्ठ नागरिक, शासकीय अधिकारी, कर्मचारी आणि विविध क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येनं सहभागी झाले. यावेळी "करो योग, रहो

निरोग"चा संदेश देत निरोगी जीवनशैलीचा मंत्र देण्यात आला. **यवतमाळमध्ये** योग दिनानिमित्त शंकर डहाके या योगपटूनं विहिरीतल्या पाण्यात योगासनं केली. दहा वर्षांपासून ते नदीत किंवा विहिरीत योगासनं करतात आणि मुलांनाही प्रशिक्षण देतात. आजचे जीवन हे धावपळीचे झाल्यामुळे मानव हा सतत मानसिक आणि शारीरिक तणावात असतो. त्याचा परिणाम आपल्या आरोग्यावर होत आहे. यावर मात करण्यासाठी नियमितपणे योगा करणे आवश्यक आहे, असं प्रतिपादन **चंद्रपूरच्या** जिल्हाधिकारी वसुमना पंत यांनी केलं. जिल्हा क्रीडा संकुल इथं आंतरराष्ट्रीय योग दिनाचं आयोजन करण्यात आलं होते, याप्रसंगी त्या बोलत होत्या. विभागीय क्रीडा संकुल, मोर्शी रोड इथं आयोजित मुख्य जिल्हास्तरीय कार्यक्रमात सुमारे २ हजार अमरावतीकरांनी एकत्रित योगाभ्यास करून आरोग्याचा संदेश दिला.

नीट परीक्षा

वैद्यकीय अभ्यासक्रमात प्रवेशासाठी नीट फेरपरीक्षा २०२६ आज देशातल्या ५५१ शहरांमधे आणि परदेशातल्या १४ केंद्रांवर सुरळीत पार पडली. परीक्षा गैरप्रकारमुक्त वातावरणात व्हावी, यासाठी राष्ट्रीय परीक्षा यंत्रणा, एनटीएनं प्रशासनाबरोबर समन्वयानं व्यापक उपाययोजना केल्या होत्या. अनेक ठिकाणी राज्यशासनातर्फे परीक्षार्थींना केंद्रावर जाण्यासाठी विनामूल्य वाहतूक सेवा उपलब्ध करून देण्यात आली होती. परीक्षा केंद्रांवर विद्यार्थ्यांच्या मदत आणि मार्गदर्शनासाठी तसंच सुरक्षिततेच्या दृष्टीनं आवश्यक कर्मचारी वर्ग तैनात करण्यात आला होता. पिण्याचं पाणी, प्रथमोपचार इत्यादी सुविधाही उपलब्ध करून देण्यात आल्या होत्या.

नगर परिषद निकाल

१० जिल्ह्यांतील ७ नगरपरिषदा आणि ७ नगरपंचायतींमधील एकूण ३८ रिक्त जागांसाठी काल २० जून रोजी मतदान घेण्यात आलं. त्याची मतमोजणी आज सुरू आहे. गडचिरोली जिल्ह्यातील नगर परिषदेच्या एक आणि नगर पंचायतीच्या दोन जागांसाठी झालेल्या पोटनिवडणुकीत भाजप, राष्ट्रवादी काँग्रेस-शरदचंद्र पवार पक्ष आणि काँग्रेस पक्षानं प्रत्येकी एका जागेवर विजय मिळवला. गडचिरोली नगर परिषदेच्या प्रभाग क्रमांक ९(अ) मधून भाजपचे अंकुश नैताम विजयी झाले. अहेरी नगर पंचायतीच्या प्रभाग क्रमांक ९ साठी झालेल्या पोटनिवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या संजना हनुमंतू मडावी १० मतांनी विजयी झाल्या, तर कुरखेडा नगर पंचायतीच्या अनुसूचित जमातीच्या महिलेसाठी राखीव असलेल्या

प्रभाग क्रमांक १६च्या पोटनिवडणुकीत शिवसेना(उबाठा) समर्थित काँग्रेसच्या उमेदवार प्रतिभा उईके निवडून आल्या. त्याचप्रमाणे अकोला जिल्ह्यातील पातूर नगरपरिषदेच्या बहुचर्चित निवडणुकीचा निकाल आज जाहीर झाला असून नगराध्यक्षपदावर काँग्रेसनं विजय मिळवला आहे. काँग्रेसचे नगराध्यक्षपदाचे उमेदवार हिदायत खान यांनी विजय संपादन करत पातूरच्या राजकारणात काँग्रेसचं वर्चस्व सिद्ध केलं. तब्बल दहा वर्षांनंतर झालेल्या या निवडणुकीकडे संपूर्ण जिल्ह्याचं लक्ष लागलं होतं. नगराध्यक्षपदासाठी ५ उमेदवार, तर २० नगरसेवक पदांसाठी ६९ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात होते.

विधिमंडळ पूर्वसंध्या चहापान

राज्य विधीमंडळाचं पावसाळी अधिवेशन उद्यापासून मुंबईत सुरू होत आहे. आज अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, तसंच उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि सुनेत्रा पवार यांनी दोन्ही सभागृहांचे गटनेते, तसंच ज्येष्ठ सदस्यांना सह्याद्री अतिथीगृहात चहापान तसंच चर्चेसाठी निमंत्रित केलं आहे.

आंदोलन

राज्यातील शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या विविध प्रलंबित मागण्यांच्या पूर्ततेसाठी विदर्भ माध्यमिक शिक्षक संघाच्या वतीनं पावसाळी अधिवेशनादरम्यान संघटनेचे सरकार्यवाह तथा आमदार सुधाकर अडबाले आणि माजी आमदार व्हि. यू. डायगव्हाणे यांच्या नेतृत्वात गुरुवार, दिनांक २५ जून रोजी दुपारी ३ ते ५ वाजेपर्यंत विभागीय शिक्षण उपसंचालक नागपूर आणि अमरावती कार्यालयासमोर तसंच विदर्भातील सर्व माध्यमिक शिक्षणाधिकाऱ्यांच्या कार्यालयासमोर धरणं आणि निदर्शनं आंदोलन करण्यात येणार असल्याची माहिती अडबाले यांनी पत्रकाद्वारे दिली आहे.

उबाठा

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या बंडखोर खासदारांपैकी दोन खासदार पक्षाच्या संपर्कात असल्याचा दावा खासदार संजय राऊत यांनी केला आहे. या खासदारांना त्यांच्या मतदारसंघातल्या जनतेच्या रोषाची भीती वाटत आहे. जर खासदारांना त्यांची चूक मान्य असेल, तर त्यांच्याशी चर्चा होऊ शकते, असंही राऊत म्हणाले. संजय दिना पाटील, संजय देशमुख, संजय जाधव, भाऊसाहेब वाकचौरे,

नागेश पाटील-आष्टीकर आणि ओमप्रकाश राजे निंबाळकर हे खासदार १७ जून रोजी दिल्लीत झालेल्या शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या बैठकीला गैरहजर राहिल्यानं पक्षांतर्गत बंडाळीच्या चर्चा सुरू झाल्या होत्या.

आषाढी वारी

आषाढी वारीनिमित्त लाखो वारकरी आणि भाविकांना दर्जेदार आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्यासाठी सार्वजनिक आरोग्य विभागानं व्यापक तयारी केली आहे. वारी मार्गावर दर पाच किलोमीटर अंतरावर प्रथमोपचार केंद्रे, आवश्यक औषधसाठा आणि रुग्णवाहिका सेवा उपलब्ध करून देण्यात येणार आहे. या पार्श्वभूमीवर आरोग्य सेवा आयुक्त संजय काटकर यांच्या अध्यक्षतेखाली आढावा बैठक पार पडली. बैठकीत पुणे, सातारा, सोलापूर आणि पंढरपूर परिसरात वारकऱ्यांसाठी उभारण्यात येणाऱ्या वैद्यकीय सुविधांचा सविस्तर आढावा घेण्यात आला. दरम्यान, पंढरपूर इथल्या आषाढी एकादशी यात्रेत सहभागी होण्यासाठी बुलढाणा जिल्ह्यातील संतनगरी शेगाव इथल्या श्री संत गजानन महाराज संस्थानची पालखी आज सकाळी 7 वाजता पंढरपूरच्या दिशेनं मार्गस्थ झाली. यंदा पालखीचं 57 वर्ष आहे.

हवामान

आगामी काही तासात नागपूर, अमरावती, वर्धा, चंद्रपूर आणि गडचिरोली इथं वादळी पर्जन्यमानाची शक्यता प्रादेशिक हवामान खात्यानं वर्तवली आहे. दरम्यान, आज सकाळी मुंबईत  पावसानं दखल दिली असून उद्यापासून मान्सून सक्रिय होण्याची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे.

*****